# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १६ जुलै, २०२५ / आषाढ २५, १९४७ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

### राज्यात महिला व मुली बेपत्ता होण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(१) * २३७८ श्री.सुनिल शिंदे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.शशिकांत शिंदे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर शहरातून गत सव्वा वर्षामध्ये एकूण ५२२७ जण बेपत्ता झाले असून त्यामध्ये ४४९१ महिला व पुरूष तर ७३६ अल्पवयीन मुलां-मुलींचा समावेश आहे, तसेच महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून सरासरी दररोज १०५ महिला-मुली बेपत्ता होत असून, महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर माहे एप्रिल, २०२४ ते २०२५ या कालावधीत ३८ हजार ३९७ महिला व मुली बेपत्ता झाल्या असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०२१ ते २०२५ या चार वर्षाच्या कालावधीत अल्पवयीन मुलींवरील अत्याचार आणि छेडछाडीचे सुमारे ३७ हजार गुन्हे दाखल झाले असून दररोज सरासरी २४ अल्पवयीन मुलींची छेड किंवा त्यांचेवर अत्याचार केला जात आहे तसेच सातारा जिल्ह्यातून गत तीन वर्षापासून ५ हजार ३१६ महिला, मुले, मुली बेपत्ता झाले आहेत, त्यापैकी ४ हजार २४४ जणांना शोधण्यास पोलिसांना यश आले असून एक हजार ८२ जण बेपत्ता असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मिशन मुस्कान, बेटी बचाव यासारख्या योजना राबविण्यात येत असतानाही महिला व मुली बेपत्ता होत असून विविध पोलीस ठाण्यांमध्ये दिवसाला २० या सरासरीने एकूण ५,९७९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे, सदर बेपत्ता झालेल्या मुलामुलींच्या शोधासाठी गृह विभागाकडून विशेष पथकाची स्थापना करुन देखील त्यांचा शोध घेण्यास पोलीस यंत्रणा पूर्णतः अपयशी ठरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने राज्यात महिला- मुलींचे बेपत्ता होण्याचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशतः खरे आहे.

नागपूर शहरात जानेवारी, २०२४ ते मे, २०२५ अखेर एकूण ५८९७ जण बेपत्ता झाले असून ४९२३ महिला व पुरूष आणि ७७६ मुले व मुली बेपत्ता आहेत.

Maharashtra Police Services for Citizens Portal या संकेतस्थळावर दिनांक ०१/०४/२०२४ ते दिनांक ३१/०३/२०२५ या कालावधीतील १८ वर्षाखालील बेपत्ता मुलींची संख्या ४०९६ तसेच १८ वर्षावरील बेपत्ता महिलांची संख्या ३३५९९ अशी दर्शविण्यात आली आहे.

(२) सन २०२१ ते माहे मे, २०२५ या चार वर्षाच्या कालावधीत अल्पवयीन मुलींवरील अत्याचार आणि छेडछाडीचे एकूण १६,१६० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सातारा जिल्ह्यातील सन २०२२ ते माहे मे, २०२५ पर्यंतच्या कालावधीतील महिला व मुली बेपत्ता माहिती खालीलप्रमाणे :

१) मिसिंग /अपहरण व अपनयन संख्या महिला ४१५६, मुली ८५४ व मुले १६५

२) मिळून आलेल्या महिला ३२७२, मुली ६६१ व मुले १४६

३) मिळून न आलेल्याची संख्या महिला ८८४, मुली १९३ व मुले १९

(३) महाराष्ट्र राज्यात हरवलेल्या महिला व बालकांच्या शोधासाठी ऑपरेशन मुस्कान अंतर्गत जुलै २०१५ ते डिसेंबर २०२४ अखेर एकूण १३ ऑपरेशन राबविण्यात आली व त्यामध्ये आतापर्यंत ४११९३ लहान मुले/मुली यांचा शोध घेण्यात आला आहे.

राज्यात हरवलेल्या महिला व बालकांसाठी “ऑपरेशन शोध” ही विशेष मोहिम प्रत्येक उप विभाग स्तरावर राबवून दिनांक १७/०४/२०२५ ते दिनांक १५/०५/२०२५ या कालावधीत रेकॉर्डवरील हरवलेल्या ४९६० महिला व १३६४ बालकांचा शोध घेण्यात आला आहे व रेकॉर्ड व्यक्तिरिक्त १०६ महिला व ७०३ बालकांचा शोध घेण्यात आला आहे.

महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग यांच्या दिनांक १५/०४/२०२५ परिपत्रकान्वये प्रत्येक पोलीस उप विभागातील सर्व पोलीस घटकांना मिसींग सेल स्थापन करण्यासाठी आदेशित करण्यात आले आहेत.

(४) राज्यात महिला-मुलींचे बेपत्ता होण्याचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाकडून दिनांक १५/०४/२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत :

१. हरवलेल्या महिला आणि बालकांबद्दल हॉटस्पॉटच्या ठिकाणाची ओळख करावी. तसेच बेपत्ता होण्याची संभाव्य कारणे जाणुन घ्यावी.

२. सदर ठिकाणी कार्यरत गुन्हेगारी टोळयाविरुध्द कठोर कारवाई सुरू करावी.

३. मिसींग सेल मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या आणि संवेदनशिल प्रतिसादाबद्दल प्रशिक्षण देण्यात यावे.

४. महिला आणि बालक यांचेशी संपर्क साधण्यासाठी कम्युनिटी पोलिसींग कार्यक्रम सक्रिय करा आणि जास्तीत जास्त प्रचार, प्रसार आणि परिणाम साध्य करण्यासाठी महिला आणि बालविकास, समाज कल्याण आणि आरोग्य विभागासह इत्तर विभागांना सहभागी करून घ्यावे.

५.पोलीस काका व पोलीस दीदी कार्यक्रमात काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांनी असुरक्षित बालकांचे ओळख करुन सक्रिय होऊन हस्तक्षेप करणेबाबत योग्य प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच महिला/बालकासाठी असुरक्षित असलेल्या ठिकाणी तसेच शैक्षणिक संस्थेच्या परिसरात प्रतिबंध व सुरक्षेसाठी परिणामकारक व व्हिजीबल (Visible) पोलीसींग राबविण्यात यावे. तसेच गरजेनुसार ह्यात पोलीस मित्रांची मदत घेण्यात यावी.

६. प्रत्येक पोलीस स्टेशनचे हद्दीत कार्यरत पोलीस काका व पोलीस दीदी यांनी त्यांच्या हद्दीतील प्रत्येक शाळा, कोचिंग क्लासेस, निवारा गृहे आणि बेपत्ता मुलांचे प्रमाण जास्त असलेल्या ठिकाणी (Hotspot) विद्यार्थ्यांसोबत संवाद सत्र आयोजित करावे.

७. तसेच ज्या ठिकाणी महिलांचे बेपत्ता होण्याचे प्रमाण जास्त आहे अशा ठिकाणी अन्य शासकीय विभाग व विश्वासार्ह समाजसेवी संस्था यांचे मदतीने जनजागृतीचे कार्यक्रम आयोजीत करावेत.

८. रिक्षा स्टॅन्ड, बस स्टॅन्ड आणि रेल्वे स्थानकाजवळील लहान दुकानदाराच्या मासिक बैठका घेऊन त्यांना बेपत्ता महिला व बालक ओळखण्याचे प्रशिक्षण देऊन पोलीसांचे डोळे आणि कान म्हणून काम करण्याबद्दल प्रोत्साहीत करावे. परिणामी मिळालेल्या उपयुक्त बातमीकरीता गुन्हे परिषदेमध्ये त्यांचा सन्मान करावा.

९. हरवलेल्या महिला/बालकांबद्दल माहिती देणेकरीता डायल ११२ तसेच महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग कार्यालयात सुरु असलेल्या महिला व बाल हेल्पलाइन ८६५७२२७७७ आणि २८७७७७७९८० चा वापर करण्यास प्रोत्साहित करावे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज दरवाढ कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२) * २६०५ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील वीज दर राजस्थान मध्ये ७.५५ ते ८.९५ रुपये प्रति युनिट, मध्य प्रदेश मध्ये ३.३४ ते ६.८० रुपये प्रति युनिट, कर्नाटक मध्ये ५.९० रुपये प्रति युनिट एवढा असून, महाराष्ट्र राज्यात वीज दर हा ५.१६ ते १७.७९ रुपये प्रति युनिट एवढा आहे, उक्त वीज दर इतर राज्यांपेक्षा अधिक असल्याची बाब आढळून आली असून महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने आर्थिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये महावितरणच्या घरगुती ग्राहकांसाठी वीज शुल्कात ४% ते १२% कपात करण्याचा आदेश दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी जारी केल्यानंतरही सदरहू निर्णयास न जुमानता महावितरण कंपनीने अतिरिक्त वीज दर आकारुन सर्वसामान्यांना विद्युत देयके पाठविली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीच्या सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक वीज दरवाढीच्या प्रस्तावाबाबत वीज नियामक आयोगाने वीज ग्राहकांचे म्हणणे, हरकत आणि सूचना मागविल्या असता, त्यावर प्रचंड हरकती आल्याने टप्पा-टप्प्याने वीज दर कमी करण्याचे आदेश वीज नियामक आयोगाने महावितरण कंपनीला दिल्यानंतर दोन दिवसातच वीज नियामक आयोगाने त्यांच्याच आदेशास स्थगिती दिल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने माहे एप्रिल महिन्यापासून होणारी वीज दरातील कपात थांबविली असल्याने राज्यभरातील लघुउद्योगांना व सामान्य ग्राहकांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असल्यामुळे जनतेकडून वीज दरवाढ मागे घेण्याबाबतची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील ८० टक्के शेतकऱ्यांना सन २०२६ अखेर १२ तास मोफत वीज देण्यात येईल तसेच पाच वर्षात राज्यातील सामान्य नागरिकांचे वीज देयक दरवर्षी कमी होणार आहे असे आश्वासन शासनाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीजेची दरवाढ कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार विद्युत अधिनियम २००३ नुसार मा.महाराष्ट्र विदयुत नियामक आयोगास आहेत.

महावितरणने नवीकरणीय उर्जेवर (प्रामुख्याने सौर, पवन, पंप स्टोरेज, बॅटरी स्टोरेज) भर दिला असून या स्त्रोतांमधून हरित वीज स्वस्त दरात मिळणार असल्याने त्याचा लाभ घरगुती, औद्योगिक आणि व्यायसायिक ग्राहकांना वीजदर कपातीच्या स्वरूपात करून देण्यात आला आहे. या कारणास्तव महावितरणच्या इतिहासात प्रथमच महावितरणने ग्राहकांकरीता वीजदर कपातीविषयी प्रस्ताव दाखल केला व त्यानुसार मा.महाराष्ट्र विदयुत नियामक आयोगाने दिनांक २५/०६/२०२५ च्या आदेशाद्वारे पुढील पाच वर्षांकरीता २% (आ.व. २०२५-२६ साठी) ते ९% (आ.व. २०२९-३० साठी) वीजदर कपात मंजूर केली आहे. सदर वीजदर १ जुलै, २०२५ पासून लागू असून सर्व वीज ग्राहकांचे वीजदर कमी होणार आहेत.

महाराष्ट्रातील ग्राहकांना लागू असलेल्या वीजदरांची इतर राज्यातील वीजदरांशी तुलना करतांना काही मूलभूत बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील ग्राहकांचे एकत्रीकरण (मिश्रण) व ग्राहकांचा भार, औदयोगिक व कृषीग्राहक यांचे प्रमाण, वीजेची उपलब्धता, वीजेचे नेटवर्क (network), तुलनेने मोठे भौगोलिक क्षेत्र इत्यादी विविध बाबींचा विचार करता, महाराष्ट्रातील वीजदराची इतर राज्याशी तुलना करणे संयुक्तिक होणार नाही.

(२) मा.वीज नियामक आयोगाच्या दिनांक २८/०३/२०२५ रोजीच्या आदेशातील त्रुटी व उणिवा महावितरण कंपनीने निदर्शनास आणुन दिल्यामुळे, मा.आयोगाने सदर आदेशास स्थगिती दिली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक २५/०७/२०२४ अन्वये "मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना- २०२४" जाहीर केली आहे सदर योजना ही ५ वर्षासाठी म्हणजेच माहे एप्रिल, २०२४ ते माहे मार्च, २०२९ पर्यंत राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत माहे एप्रिल २०२४ पासून ७.५ एच.पी पर्यंतच्या सर्व शेती पंप ग्राहकांना मोफत वीज देण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३) * २५२३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरामध्ये सेफ सिटी प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये १६८ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून सद्य:स्थितीत सर्व सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी सेफ सिटी प्रकल्पांतर्गत रुपये १२ कोटी एवढ्या रकमेचा दुसऱ्या टप्प्यातील प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पास अद्याप मंजुरी मिळाली नसल्यामुळे कोल्हापूर शहराची सुरक्षा धोक्यात असल्याची बाब निदर्शनास आली असून, शासनाने सदर प्रस्तावाला मंजूरी देण्याकरीता कोल्हापूर शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

कोल्हापूर महानगरपालिका मार्फत कोल्हापूर शहर सुरक्षित प्रकल्पाची अंमल बजावणी करणेसाठी पहिल्या टप्प्यामध्ये महत्वाच्या ६५ ठिकाणी १६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सदरचा प्रकल्प कोल्हापूर महानगरपालिकाकडून पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी वर्ग करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर कार्यालयाकडून सदर सीसीटीव्ही

प्रकल्पाचा देखभाल व दुरुस्तीसाठी पहिला करार समाप्त झालेनंतर नव्याने चालू वर्षी दिनांक ५/०३/२०२५ ते ४/०३/२०२६ या एका वर्ष कालावधीसाठी सेवासंविदा करार पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर यांच्या कार्यालयीन आदेश क्र. ४४२३ दिनांक ५/०३/२०२५ अन्वये करण्यात आला आहे.

उक्त प्रमाणे सेवासंविदा करार झालेनंतर १६५ सीसीटीव्ही कॅमेरेपैकी मे, २०२५ च्या पहिल्या सप्ताहामध्ये १०२ सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करण्यात येवून कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर माहे मे च्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत १५३ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरीत १२ कॅमेरे सुरु करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून सद्य:स्थितीमध्ये कोल्हापूर शहरामधील वरील प्रमाणे सीसीटीव्ही यंत्रणा सुरु असून ती सुरळीतपणे कार्यान्वित आहे.

(२) होय हे खरे आहे.

कोल्हापूर सुरक्षित शहर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम कोल्हापूर महानगरपालिका व जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या संयुक्त निधीमधून यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आला असून प्रस्तुत प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये सी.सी.टी.व्ही. संनिरीक्षण प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्याकरीता अंदाजे रुपये १२ कोटी इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविण्यात आले असून महत्वाच्या ६५ ठिकाणी १६५ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे साधनसामुग्रीसह बसविण्याकरीता प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याबाबत तसेच निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास प्राप्त झाला होता.

(३) सीसीटीव्ही संनिरीक्षण यंत्रणा सविस्तर प्रकल्प (DPR) / विनंती प्रस्ताव (RFP) बाबत दिनांक २५/०१/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आली असून त्यास अनुलक्षून कोल्हापूर शहर सीसीटीव्ही बसविण्याचा प्रस्ताव (DPR) अद्ययावत करुन शासनास सादर करण्याचे निर्देश पोलीस महासंचालक कार्यालयास दिनांक २८/१०/२०२४ व दिनांक २८/०५/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दापोडी (जि.पुणे) व चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील मध्यवर्ती कार्यशाळेत भांडार खरेदीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(४) * २८१२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोडी (जि.पुणे) येथील मध्यवर्ती कार्यशाळेत भांडार खरेदीत झालेल्या अनियमिततेबाबत प्रधान महालेखापाल यांच्यामार्फत विशेष लेखापरीक्षण करण्याबाबत शासनाने अद्याप निर्णय घेतला नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दापोडी (जि.पुणे) येथील मध्यवर्ती कार्यशाळेत सन २०१०-२०२० या कालावधीत काम केलेल्या दोन अधिकाऱ्यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरू केली असून उक्त अधिकाऱ्यांविरूध्द अन्य ठिकाणी केलेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारीदेखील सदर विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी महाव्यवस्थापक (भां व ख) व विद्यमान वरिष्ठ भांडार अधिकारी, चिकलठाणा मध्यवर्ती कार्यशाळा (जि.छत्रपती संभाजीनगर) यांच्याविरोधातील अन्य तक्रारींबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरू केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दापोडी, जि.पुणे येथील मध्यवर्ती कार्यशाळेत तसेच चिकलठाणा, जि.छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती कार्यशाळेच्या भांडार खरेदीत झालेल्या अनियमिततेबाबत चौकशी करुन सदर प्रकरणी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी पुणे येथील भांडार खरेदी बाबत सहाय्यक लेखा परिक्षण अधिकारी, रा.प.अंतर्गत लेखा परिक्षण पथक, पुणे यांच्याकडून विशेष लेखा परिक्षण करण्यात आले.
(२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी अनियमीतता झाल्याची बाब दिसून आली, त्यामधील संबधीतांविरुध्द प्रमादिय कारवाई केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राथमिक माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असून, सद्य:स्थितीत ला.प्र.वि. यांचेकडून अंतिम अहवाल अप्राप्त आहे.

तसेच वरिष्ठ भांडार अधिकारी, चिकलठाणा, मध्यवर्ती कार्यशाळा,छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे, व सातारा विभागांतर्गत कार्यरत असताना झालेल्या अनियमितते प्रकरणी रा.प.महामंडळाकडून चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमध्ये वाहनांचे बेकायदेशीररित्या पार्किंग करण्यात येत असल्याबाबत

**(५) * २३४२ श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात येणाऱ्या वाहनांसाठी ‘महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने’ कोटयवधी रुपये खर्च करून १२० वाहने उभी करता येतील इतक्या क्षमतेचे वाहनतळ मौजे तोंडारे गावात उभारले असतानाही तळोजा औद्योगिक वसाहतीतून जाणाऱ्या मुख्य मार्गावरच अनेक चालक बेकायदेशीररित्या वाहने उभी करित असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी स्थानिक रहिवाशी व कामगार सातत्याने करित असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू औद्योगिक वसाहतीमध्ये ११०० पेक्षा जास्त कारखाने असून येणाऱ्या वाहनांची संख्या फार मोठी असल्याने याच मार्गावरून ठाणे, कल्याण, डोंबिवली व भिवंडीकडे जाणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून दिवसेंदिवस अपघातांचेही प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर औद्योगिक क्षेत्र परिसरात बेकायदेशीररित्या पार्किंग करणाऱ्या वाहनचालक/मालक यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

सध्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा असलेला वाहनतळाची क्षमता १४० वाहने पार्क करण्याची असून तेथे वाहने पार्क केली जातात.

काही वेळा मोठ्या प्रमाणात वाहने तळोजा औद्योगिक वसाहतीत आल्याने रस्त्यावर काही ठिकाणी पार्कींग केलेले दिसून येते. त्या-त्या वेळेस वाहतुकीस अडथळा करणाऱ्या ३८९८ वाहनांवर तळोजा वाहतूक शाखेकडून मोटार वाहन कायदा अन्वये कारवाई करण्यात आली आहे. रस्त्यावर वाहने पार्क केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्याचे त्या त्या वेळी निरंसन करण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

एमआयडीसी रोड आयजीपीएल चौक ते उसाटने रोडवरुन कल्याण, डोबिंवली, भिवंडीकडे जात असल्याने नमूद रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतूक चालू असते. सध्या एमआयडीसी रोडवर आयजीपीएल चौक ते उसाटने रोडचे कॉंक्रीटीकरणाचे काम सुरु असल्याने सदरचा रस्ता खूप अरुंद झाला आहे. त्यामुळे वाहतूक संथ गतीने चालू असते, तळोजा वाहतूक शाखेचे अंमलदार सदर रोडवर वाहतूक नियमन करुन वाहतूक कोंडी दूर केली जाते. सदर ठिकाणी अपघाताचे प्रमाण कमी झाले आहे.

(३) तळोजा वाहतूक शाखा हद्दीत वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या वाहनांवर मो.वा.कायदा अन्वये नियमितपणे कारवाई करण्यात येते.

वाहनचालकानी वाहने रोडवर पार्क करु नये याकरीता १०७ प्रबोधन कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत. जानेवारी २०२५ ते अद्यापपर्यंत ३८९८ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतूक नियंत्रणसाठी आवश्यक मनुष्यबळ नेमण्यात येते. ट्रॅफिक बीट मार्शल नेमण्यात येत आहेत व PA System चा वापर करुन उदघोषणा केली जाते. ज्या ठिकाणी रस्ता दुरुस्तीचे काम चालू आहे. तेथे वॉर्डन व वाहतूक पोलीस यांचे मदतीने वाहतूक नियमन करण्यात येत आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांच्या बैठका घेऊन आस्थापनेतील उपलब्ध जागेचा पार्किंगकरीता वापर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात खंडित वीज पुरवठ्यामुळे धान पिकाचे नुकसान होत असल्याबाबत

**(६) * ३४५१ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात वेळापत्रकानुसार वीजपुरवठा होत नसल्याने रब्बी हंगामातील धान पीक पाण्याअभावी करपले असून खंडित वीजपुरवठ्यामुळे सिंचन होत नसल्याने धान पिकाच्या शेतात भेगा पडल्याने शेतकरी हवालदिल झाल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सालेकसा व आमगाव तालुक्यात रब्बी धानाची हजारो हेक्टरवर लागवड करण्यात आली असताना कृषीपंपांना अखंडित वीजपुरवठा होत नसल्याने रात्रभर जागूनसुद्धा शेतीला सिंचन करणे कठीण झाले असून अघोषित भारनियमन व खंडित वीजपुरवठा या समस्यांनी परिसरातील शेतकरी त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोंदिया जिल्ह्यात वेळापत्रकानुसार वीजपुरवठा करून रब्बी धानाची हजारो हेक्टरवरील लागवड वाचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

आमगाव, ता.आमगाव, जि.गोंदिया येथील महापारेषणच्या १३२/३३ के.व्ही. विद्युत अति उच्चदाब उपकेंद्रामधील ५० एम.व्ही.ए. क्षमतेचे उच्चदाब रोहित्र क्र. १ दिनांक २०/०३/२०२५ रोजी नादुरुस्त झाले. त्यामुळे त्या रोहित्रावरील असलेला संपूर्ण वीज भार हा तात्पुरत्या स्वरुपात त्याच उपकेंद्रातील दुसऱ्या ५० एम.व्ही.ए. रोहित्र -२ वर घेण्यात आला. सदर उच्चदाब रोहित्र हे अतिभारित झाले होते. त्यामुळे सदर उपकेंद्राचा भार नियंत्रित ठेवण्यासाठी व शेतीपंपांचा वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी ३३/११ के. व्ही. तेढा, मोहाडी आणि झिलमिली उपकेंद्रांचा भार हा महापारेषणच्या दुसऱ्या १३२/३३ के.व्ही.एम.आय.डी.सी. मुंडीपार उपकेंद्रावर घेण्यात आला. या उपकेंद्रातुन वीज पुरवठा करण्यात येणारी ३३/११ के.व्ही. उपकेंद्रे आमगाव, ठाणा, कालीमाटी, सालेकसा, कावराबांध, तिरखेडी, साखरीटोला, मुल्ला, देवरी, चिचगड, तेढा, मोहाडी आणि झिलमिली या १३ उपकेंद्रामधून वितरीत करण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्याचा भार कमी करण्याबाबत सूचना देणे गरजेचे ठरले. त्यानुसार वरील नमुद केलेल्या उपकेंद्रातील ११ के. व्ही. वाहिन्यांवर तात्पुरत्या स्वरुपात चक्राकार पध्दतीने वेळापत्रकाचे नियोजन करुन कृषीपंपांना दिवसा व रात्री असा वीज पुरवठा देण्यात आला.
(३) महापारेषण कंपनीद्वारे दिनांक २७/०३/२०२५ रोजी नादुरुस्त ५० एम.व्ही.ए. रोहित्र क्र.१ च्या ठिकाणी २५ एम.व्ही.ए.चे नवीन रोहित्र बसविण्यात आले. वाढीव मागणी लक्षात घेता सदर रोहीत्र बदलून महापारेषण कडून ५० एम.व्ही.ए. क्षमतेचे रोहीत्र बसविण्याचे नियोजन सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ओला इलेक्ट्रीक मोबिलिटी लिमिटेड कंपनीच्या शोरूमवरील कारवाईबाबत

**(७) * २६४८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ओला इलेक्ट्रीक मोबिलिटी लिमिटेड कंपनीच्या शोरूमवर राज्य परिवहन विभागाने कारवाई केली असता एकाच व्यावसायिक प्रमाणपत्राच्या आधारे अनेक शोरूम उघडली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओलाच्या १४६ शोरूमपैकी केवळ २७ जणांकडे ट्रेड सर्टिफिकेट असल्याचे आढळून आले असून ट्रेड सर्टिफिकेट नसलेल्या शोरूमवर तसेच त्यांच्याकडून विकण्यात आलेल्या वाहनांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.

(२) सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय/सर्व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे मे. ओला इलेक्ट्रीक मोबिलिटी लिमीटेड या कंपनीच्या शोरूम ची तपासणी करण्यात आली असता, एकूण ४३२ शोरूम पैकी ४७ शोरूमकडे ट्रेड सर्टिफिकेट असल्याचे आढळून आले असून ट्रेड सर्टिफिकेट नसलेले उर्वरित ३८५ शोरूम बंद करण्यात आले आहेत. तसेच त्यांच्याकडून विकण्यात आलेल्या ५७६ वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली असून त्यांना तपासणी प्रतिवेदन जारी करून वाहने ब्लॅकलिस्ट करण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंब (जि.यवतमाळ), सातारा व नागपूर येथे मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(८) * ३६६९ श्री.संजय खोडके, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सदाशिव खोत, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कळंब (जि.यवतमाळ) येथे मोठ्या प्रमाणात एम.डी. ड्रग्ज विक्री होत असून स्थानिक गुन्हे शाखेच्या तपास यंत्रणेने तीन जणांना अटक केली असल्याचे तसेच विदर्भातील कारागृहात ५० पेक्षा अधिक कैदयांच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यामध्ये तस्करी होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे कशेळे (ता.कर्जत) येथील एका फार्म हाऊसमध्ये शेतीपालनाच्या नावाखाली ड्रग्ज निर्मितीची फॅक्टरी सुरू असून तेथे अकरा कोटीचे एमडी ड्रग्ज आढळून आले असून, उक्त ठिकाणी अकरा कोटींच्या एम.डी.ड्रग्जसह एक कोटी रुपयांचा कच्चा माल देखील जप्त करण्यात येऊन या प्रकरणात सहा जणांना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातारा येथील सुर्यप्रभा फॉर्मकेन कंपनीतून ६ कोटी ३५ लाख रुपयांचे कोकेन तळबीड पोलिसांनी दिनांक २३ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास जप्त केले असून, उक्त एमआयडीसीत खते बनविण्यात येत असल्याचे दाखवून अंमली पदार्थांची विक्री केली जात असल्याचे तसेच नागपूर शहरामध्ये माहे मे,२०२५ मध्ये २० दिवसामध्ये वेगवेगळया ठिकाणी टाकलेल्या छाप्यामध्ये १ कोटी ४३ लाख १२ हजार रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले, त्यामध्ये कोणकोणत्या प्रकारचे, किती रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले व जप्त केलेले अंमली पदार्थ शेजारील राज्यातून आल्याचे देखील चौकशीत निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले अंमली पदार्थांमुळे युवा पिढीवर मोठा परिणाम होत असल्यामुळे विदर्भासह राज्यात अंमली पदार्थ विक्रेत्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी तसेच अंमली पदार्थांवर कायमस्वरुपी बंदी आणण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथे पोलीसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, एम.डी.ड्रग्ज (मेफेड्रॉन) बाळगल्या प्रकरणी तीन व्यक्तींविरुध्द कार्यवाही करण्यात आली असून, सदर प्रकरणी कळंब पो.स्टे. येथे अप.क्र. २०७/२०२५, एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम ८(क), २१(क), २९ अन्वये दिनांक २९/०३/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील तिन्ही आरोपींना वेळीच अटक करण्यात आली असून, सदर आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे व गुन्हा न्याय प्रविष्ट आहे.

तसेच पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे प्राप्त माहितीनुसार, विदर्भातील कारागृहातील कैद्यांच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यामध्ये ५० पेक्षा जास्त तस्करी होत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली नाही.

(२) पोलीस आयुक्तालय, बृहन्मुंबई कार्यक्षेत्रातील आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१५९/२०२५, एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम ८(क), २२(क) सह २९ अन्वये नोंदविलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान मौजे किकवी, ता.कर्जत जि.रायगड येथे सावली रिसोर्ट या ठिकाणी दिनांक २६/०५/२०२५ रोजी ५ किलो वजनाचा अंदाजे रुपये ११,०५,००,०००/-इतक्या किंमतीचे एमडी (मेफेड्रोन) या नावाचा अंमली पदार्थ आणि रुपये ६,७८,०००/- इतक्या किंमतीचा MYTHYLEMINE व MONOMYTHYLEMINE या नावाचा नियंत्रीत पदार्थ आणि अंदाजे रुपये १,००,००,०००/- इतक्या किंमतीचे अंमली पदार्थ तयार करण्यासाठी वापरण्यात आलेले इतर रसायने व साहित्य असा कच्चा माल मिळून आला आहे. सदर गुन्ह्यात सहा आरोपींना अटक करण्यात आले असून सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

(३) पोलीस अधीक्षक, सातारा यांचे कार्यक्षेत्रातील तळबीड पो. ठाणे हद्दीतील सुर्यप्रभा फॉर्मकेन कंपनी तासवडे येथे रुपये ६ कोटी ३५ लाख इतक्या किंमतीचे कोकेन हे अंमली औषधीद्रव्ये बेकायदेशिररित्या विक्री करण्याचे उद्देशाने मिळून आल्याने,तळबीड पोलीस ठाणे येथे दिनांक २३/०५/२०२५ रोजी गुरनं.७८/२०२५, एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क), २२ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात ५ आरोपी निष्पन्न झाले असून, त्यांना वेळीच अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्हातील पुढील तपास सुरू आहे.

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे कार्यक्षेत्रांतर्गत माहे मे, २०२५ मध्ये अंमली पदार्थ बाळगणारे, विक्री करणारे, सेवन करणारे इसमांविरुध्द तसेच अवैधिरित्या लपून छपून विक्री करणाऱ्या संशयित ठिकाणी/हॉटस्पॉट येथे पेट्रोलिंग करुन पेट्रोलिंग दरम्यान तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या बातमीच्या आधारे माहिती प्राप्त होताच धाड टाकून करण्यात आलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे.

| अंमली पदार्थ | दखल केसेस | अटक आरोपी | जप्त अंमली पदार्थ किंमत |
|---|---|---|---|
| गांजा | १७ | २२ | ७,१४,८५५ |
| एम.डी. | १८ | ४३ | ९८,०७,४६० |
| अफीम | ०१ | ०१ | ४,९४,००० |
| सेवनार्थी | १३४ | १४५ | - |
| एकूण | १७० | २११ | १,१०,१६३१५ |

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या प्राप्त माहितीनुसार नागपूर शहरांमध्ये गांजा, एम.डी. पावडर व अफिम हे अंमली पदार्थ मुख्यत: आंध्रप्रदेश, तेलंगाना, ओरिसा, राजस्थान, उत्तर प्रदेश या राज्यातून छुप्या मार्गाने आणला जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(४) राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द/ जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द/ सेवनार्थी विरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात सन २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत सेवनार्थीच्या विरुध्द १९२०६ गुन्हे दाखल असून १६९०५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करणे संदर्भात एकूण ३५२१ गुन्हे दाखल झालेले असून ४७६५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रुपये ४३३८.९० कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालीलप्रमाणे उपाययोजना करते.

- राज्यात अंमली पदार्थ तस्करांविरुध्द विशेष मोहीमा, ड्रग्ज मुक्त अभियान, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.
- केंद्र शासनाच्या दिनांक २५/०३/२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे.
- शासन निर्णय दिनांक ०६/०८/२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरीक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
- शासन निर्णय क्र. एपीओ-३१२३/ प्र.क्र.८२/ पोल-३, दिनांक १९/०३/२०२५ अन्वये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दिनांक १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात आला आहे. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्द्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसमधील अपुऱ्या प्रवास सुविधांबाबत

**(९) * ३८६६ श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील शिवशाही बसमधील प्रवास सुविधांची दुरवस्था झाली असून, बसमधील वातानुकुलीत सेवेसाठी जादा पैसे भरून देखील प्रवाशांना चांगल्या दर्जाची सुविधा उपलब्ध होत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई–अहमदाबाद महामार्गावर डहाणू (जि.पालघर) येथील परिवहन महामंडळाच्या धावत्या शिवशाहीच्या टपाचा भाग उडाला असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुतांश शिवशाही बसेसमध्ये बंद पडलेली वातानुकुलीत यंत्रणा, मळके पडदे, फाटलेली आसन कव्हर आणि कापूस निघालेली आसने आढळून येत असल्यामुळे प्रवाशांची संख्या कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या शिवशाही बसेस मधील प्रवाशांना चांगल्या दर्जाची सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) सदर बाबत वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसारीत झाली आहे.

(२) पालघर- स्वारगेट या नियतावर धावत असताना दुर्वेध येथे शिवशाही वाहनातील प्रवासी कक्षातील वाहनाच्या छतावरील संकटकाळी बाहेर पडण्यासाठी असणारी छोटीशी झडप (रूफ हॅच) ही हवेच्या दाबामुळे उडून गेल्याची घटना घडली आहे.

(३) नाही.

(४) व (५) शिवशाही बसेसमधील वातानुकूलित यंत्रणा कार्यान्वित राहण्याकरीता वातानुकूलित यंत्रणेची नियमित त्रैमासिक देखभाल व दुरूस्ती करण्यात येते. तसेच, दैनंदिन देखभाल, दशदिनी देखभाल व डेपो डॉकिंग आगार कार्यशाळेत केले जाते.

-----------------

## भूकूम (ता.मुळशी, जि.पुणे) येथील विवाहितेने केलेल्या आत्महत्येची चौकशी करण्याबाबत

**(१०) * ४००४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सचिन अहिर, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूकूम (ता.मुळशी, जि.पुणे) येथील श्रीमती वैष्णवी हगवणे या २३ वर्षीय महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची बाब दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मयत महिलेच्या आई वडिलांनी आपल्या मुलीने आत्महत्या केलेली नसून तिचा खून झाल्याचा आरोप केलेला असून मयताच्या अंगावर अनेक मारहाणीचे खुणा आढळल्याचे शवविच्छेदन अहवालात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणात सासरच्या मंडळीकडून हुंड्यासाठी होणाऱ्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचे प्राथमिक चौकशीतून समोर आले असून पोलिसांनी मयत महिलेचा नवरा, सासरा, सासू व नणंद इत्यादींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मृत महिलेच्या मोठ्या जावेने देखिल सासरच्या व्यक्तींविरुध्द पोलीस ठाण्यामध्ये यापूर्वी तक्रार दाखल केली असता राज्य महिला आयोग किंवा पोलिसांकडून या तक्रारीवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही तसेच सदरील हुंडाबळी प्रकरणी राज्यातील सर्वस्तरांतून संताप होत असून याप्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने हुंड्यासाठी छळ करणाऱ्या संबंधितांवर कडक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) खरे आहे.
(२) सदर प्रकरणी सासरकडील कुटुंबियांच्या छळाला कंटाळून पीडितेने आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. वैद्यकीय अधिकारी ससून हॉस्पिटल, पुणे यांच्या शवविच्छेदन अहवालात पीडितेच्या अंगावर मारहाणीच्या जखमा आढळून आल्याचे नमूद केले आहे.
(३) खरे आहे.

सदर प्रकरणामध्ये एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली होती. यातील पीडितेचे पती, सासरे, सासू व नणंद हे सद्य:स्थितीत न्यायालयीन कोठडीत आहेत.
(४) मृत महिलेच्या जावेची आई व भाऊ यांनी दिनांक ०६/११/२०२४ रोजी राज्य महिला आयोगाकडे ई-मेलद्वारे तक्रार अर्ज दाखल केला असून राज्य महिला आयोगाने दिनांक ०७/११/२०२४ रोजी ई-मेलद्वारे पौड पोलीस ठाणे येथे सदरच्या अर्जावर योग्य ती नियमानुसार चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

सदर प्रकरणी मृत महिलेच्या जावेने दिलेल्या तक्रारीवरुन पौड पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण येथे गु.र.क्र.४८५/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४, ११५, ३५२, २९६, ३ (५) अन्वये दिनांक ०५/११/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास करुन आरोपी यांचेविरुध्द दिनांक २३/०५/२०२५ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) सदर प्रकरणी बावधन पोलीस स्टेशन गु.र.नं. २०६/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ८० (२), १०८, ११५ (२), ११८ (१), ३५२, ३५१ (२), ३ (५), ६१ (२), २४९ (ब), ८५, ४९ सह जे. जे. ॲक्ट कलम २०१५ कलम ७५, ८७ सह हुंडा प्रतिबंधक अधिनियम, कलम ४ प्रमाणे दिनांक १७/०५/२०२५

रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी ६ आरोपी न्यायालयीन कोठडीत असून, ५ आरोपींना मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सद्य:स्थितीत गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तिवसा (जि.अमरावती) येथील पोलीस स्टेशनच्या वाहनाच्या अपघाताची चौकशी करण्याबाबत

**(११) * ४०७३ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) मौजा शिंदोळा, गुरुदेव नगर मोझरी येथे पोलीस स्टेशनच्या वाहनाचा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे काम सुरू असताना दिशादर्शक फलक नसल्यामुळे अपघात झाला असून या अपघातामध्ये एक जणाचा जागीच मृत्यू व एक जण गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक बाब दिनांक १५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी १५ दिवसांचा कालावधी उलटूनही तिवसा पोलीस स्टेशनच्या वाहनचालकांवर अद्याप गुन्हा नोंदविला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी वाहनचालक व राष्ट्रीय महामार्गाचे काम करणारे दृष्टी कंन्स्ट्रकशन कंपनी, नागपूर यांच्या हलगर्जी/निष्काळजीपणामुळे झालेला अपघाताची चौकशी करून दोषींविरुध्द गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

दिनांक १५/०४/२०२५ पोलीस स्टेशन तिवसा डायल ११२ शासकीय वाहन घटनास्थळाला भेट देऊन परत येत असताना तिवसा मोझरी रोडचे काम चालू होते. त्या ठिकाणी रिप्लेक्टर लावून वाहतूक जाण्यायेण्याची व्यवस्था करण्यात आली होती. अचानक नवीन बायपास कडून ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालून पोलीस स्टेशनच्या वाहनाला धडक दिल्याने वाहन रोडच्या बाजूला फेकले गेले. त्याचवेळी मोपेड वाहनावर आलेले इसम जखमी झाले व त्यातील एक इसम उपचारा दरम्यान मरण पावले.
(२) सदर प्रकरणी कसुरदार ट्रकचा चालक याने दिशादर्शक व रिप्लेक्टर असूनसुध्दा वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून तिवसा पोलीस स्टेशनच्या वाहनाला जबर धडक दिली. त्यामुळे वाहन दुसऱ्या बाजूला फेकले गेले व त्याच वेळी मोपेडवर आलेले दोन इसम पोलीस स्टेशनच्या वाहनावर धडकले. दोघेही जखमी झाले त्यातील एकाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. सदर अपघातात तिवसा पोलीस स्टेशनच्या वाहनाचा दोष नसल्याने पोलीस स्टेशनच्या वाहनावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर ठिकाणी त्या दिशेने वाहन क्रमांक सी जी ०७, सीटी ३७२८ चे चालकावर पोलीस स्टेशन तिवसा येथे अप क्रमांक ३०५/२०२५ कलम २८१, १२५ (इ), ३२४(४)(५) भा. न्या. संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोदवड (जि.जळगाव) येथील तरुणीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(१२)** * **४०९६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (ता.बोदवड, जि.जळगाव) येथील तरुणीशी सोशल मिडीयांच्या माध्यमातून जवळीक साधून लैंगिक अत्याचार करून फोटो व व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी दिल्याची घटना दिनांक २७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीडीत तरुणीकडून पैशाची मागणी करुन उक्त रक्कम ऑनलाईन माध्यमातून घेतल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषीवर कारवाई करणेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पीडितेने दिलेल्या प्रथम खबर अहवालात नमूद केल्याप्रमाणे तिचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी आरोपीने दिली होती, तथापि, सदर प्रथम खबर अहवालात आरोपीने पीडितेकडून पैशाची मागणी करुन ऑनलाईन माध्यमातून रक्कम घेतल्याचे नमूद केलेले नाही. तसेच सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये देखील आरोपीने पैशाची मागणी करुन पैसे घेतल्याची बाब निष्पन्न झालेली नाही.

(३) सदर प्रकरणी रामानंदनगर पोलीस ठाणे, जि.जळगाव येथे गु.र.नं. २०५/२०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ६९, ३५१(२), ३५१(३) अन्वये दिनांक २७/०५/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्ह्यातील आरोपीस दिनांक २७/०५/२०२५ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक ०७/०७/२०२५ रोजी जामीन मंजूर झाला आहे. सद्य:स्थितीत गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील राज्य मार्ग महामंडळातील निवृत्ती कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणाची रक्कम मिळाली नसल्याबाबत

**(१३)** * **४१३६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील निवृत्त कर्मचाऱ्यांना वेतनवाढीची रक्कम समान हप्त्यामध्ये न मिळणे तसेच निवृतीच्या वेळी शिल्लक असलेल्या रजेच्या रोखीकरणाची रक्कम माहे सप्टेंबर, २०२३ पासून मिळाली नसून सदरची थकीत रक्कम अंदाजे ८० कोटी रुपये असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाकडे निवृत्त कर्मचाऱ्यांची थकित रजेची रक्कम म्हणून प्रत्येकी दोन लाख ते आठ लाखांपर्यंत जमा असूनही निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची रक्कमही मिळत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या निवृत्त कर्मचाऱ्यांची वेतन वाढीची तसेच शिल्लक रजेच्या रोखीकरणाची थकीत रक्कम सदर कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२)(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाने माहे मार्च, २०२४ अखेर पर्यंतची सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची रक्कम अदा केलेली आहे. तसेच माहे एप्रिल, २०२४ ते मार्च, २०२५ पर्यंतची सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची रजा रोखीकरणाची रक्कम रुपये ६६.७९ कोटी असून निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत

**(१४) * ४३०५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांवरील बेकायदेशीर बांधकामे आणि अतिक्रमणांमध्ये वाढ झाली असून सदर अतिक्रमणांची शासन पातळीवर पाहणी झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाहणीत गडकिल्ल्यांवर बेकायदेशीर अतिक्रमणे आणि बांधकामे करण्यात आले असल्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे आणि बेकायदेशीर बांधकामे पाडण्यासाठी व भविष्यात अशी अतिक्रमणे होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) हे खरे आहे.

शासन निर्णय क्र.स्मारके-२०२४/प्र.क्र.०६/सां.का.३, दिनांक २०/०१/२०२५ अंतर्गत सर्व जिल्ह्यातील केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड-किल्ले या ठिकाणी अतिक्रमणे दूर करण्यासाठी तसेच अतिक्रमण पुन्हा होऊ नयेत, यासाठी संबंधित मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने मा.मंत्री व मा.मुख्य सचिव तसेच त्या त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांचेस्तरावर बैठका घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

संबंधित जिल्हाधिकारी यांनी अतिक्रमण असलेल्या ठिकाणी केलेल्या कार्यवाहीचे अहवाल संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांच्याकडे सादर केले आहेत.

(३) वरीलप्रमाणे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळास भाडेतत्वावरील इलेक्ट्रीक बस पुरवठा करण्याचे कंत्राट रद्द केल्याबाबत

**(१५)** * **४३८२ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाने इव्हे ट्रान्स कंपनीशी विजेवर चालविण्यात येणाऱ्या ५१५० बस कंत्राटी पध्दतीने घेण्याचा करार केला असून दर महिन्याला २१५ बसेस पुरवठा करण्यात कंपनीला अपयश आल्यामुळे सदर कंपनीचे कंत्राट रद्द करण्यात आल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इव्हे ट्रान्स कंपनीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळासोबत केलेल्या करारानुसार महामंडळास आतापर्यंत किती बसेसचा पुरवठा केला त्यासाठी किती आगाऊ रक्कम अदा करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी राज्य परिवहन मंडळास विलंबाने बसेस पुरवठा करणाऱ्या इव्हे ट्रान्स कंपनीचा खरेदी करार केव्हा रद्द आला आहे तसेच सदर इव्हे ट्रान्स कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) नाही.

(२) ५१५० ई-बस प्रकल्पांतर्गत आज अखेर २४० बसेसचा पुरवठा करण्यात आलेला आहे. पुरवठादारास आगाऊ रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(३) व (४) पुरवठादार कंपनीसमवेतचा करार रद्द करण्यात आलेला नाही. परंतु, बसेसचा पुरवठा विलंबाने केला असल्याने पुरवठादार कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

-----------------

## मुंबईतील बांद्रा ते दहिसर या क्षेत्रात इमारतींसाठी आवश्यक असलेले ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्जदारांना अडचणी येत असल्याबाबत

**(१६)** * **४४२० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांद्रा ते दहिसर या क्षेत्रात नव्याने उभारल्या जाणाऱ्या उद्योगांकरीता तसेच निवासी इमारतींसाठी आवश्यक असलेले ऊर्जा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) मिळविण्यासाठी अर्जदारांना विद्युत विभागातील विद्युत निरीक्षक व त्यांच्या सहकाऱ्यांमार्फत लाखो रुपयांची मागणी केली जात असून, ना-हरकत प्रमाणपत्रासाठी जाणीवपूर्वक विलंब व अडचणी निर्माण करून मानसिक त्रास दिला जात असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी तक्रार करुनही विद्युत निरीक्षक यांचे वरीष्ठ अधिकाऱ्यांशी आर्थिक हितसंबंध असल्यामुळे त्यांचेवर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्या अनुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या विद्युत निरीक्षक व इतर कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांची स्वतंत्र व उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

विद्युत निरीक्षक, सांताक्रुझ कार्यालयामार्फत इमारतींसाठी आवश्यक असलेले ऊर्जा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) विहित मुदतीत देण्यात येते. ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याच्या अनुषंगाने माहे मे, २०२५ मध्ये मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई तसेच त्यांच्या अधिनस्त विद्युत निरीक्षक,निरीक्षण विभाग, सांताक्रुझ या कार्यालयात तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात वीजपुरवठा खंडित होत असल्याबाबत

**(१७)** * ४४६९ **श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दररोज ४ ते ८ तास वीजपुरवठा खंडित होत असून, नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झालेले आहे व वीज वितरण व्यवस्थेतील अनागोंदी कारभारामुळे ही स्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीजपुरवठा खंडित करताना कोणतीही पूर्वसूचना न देता वारंवार विजेचा तुटवडा निर्माण केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, महावितरणच्या मनमानी कारभारामुळे जनतेचा शासनावरील विश्वास कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर खंडित होणाऱ्या वीजेमुळे पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावर परिणाम होणे, शेतीसाठी पंपसंच वापरण्यात अडचणी निर्माण होणे, विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे नुकसान होणे व ग्रामीण भागातील लघुउद्योगांवर प्रतिकूल परिणाम होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये मे, २०२५ मध्ये अतिवृष्टी व वादळ झाल्यामुळे उच्चदाब वाहिनी व लघुदाब वाहिनी यांचे पोल पडल्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला होता. परंतु युध्दपातळीवर काम करुन सदर खंडित झालेला वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करण्यात आला आहे.

(४) अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये सन २०२५-२६ या वर्षात वीज वितरण यंत्रणा देखभाल व दुरुस्तीसाठी रुपये ७३.०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली असून मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. डीपीडीसी योजनेंतर्गत वर्ष २०२४-२५ मध्ये ४९७ नवीन रोहित्र मंजूर असून ३२३ रोहित्रे बसविण्यात आली आहेत. तसेच १२ रोहित्रांची क्षमतावाढ करण्यात आली आहे. निरंतर वीज योजनेतंर्गत १०६ रोहित्रांची ६३ केव्हीए ते १०० केव्हीए तसेच १२ रोहित्रांची १०० केव्हीए ते २०० केव्हीए क्षमतावाढ करण्यात आली आहे. RDSS Loss Reduction योजनेद्वारे एरियल बंच केबल- १५२७ कि.मी. पैकी १२०० कि.मी. चे काम पूर्ण तसेच २५ केव्हीए क्षमतेचे १९८ रोहित्रांपैकी १४० रोहित्राचे काम पूर्ण झाले आहे. उच्चदाब वाहिनी नवीकरण- ३८३ कि.मी. पैकी २०४ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक डायोसेशन कौन्सिल या संस्थेने बेकायदेशीररित्या जागा विक्री करून गैरव्यवहार केल्याबाबत

**(१८)** * **४५३३ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन प्रायव्हेट लिमिटेड (NDTA) या मूळ कंपनीच्या नावावर असलेली जागा नाशिक डायोसेशन कौन्सिल (एनडीसी) या संस्थेने तिच्या नावाचा वापर करुन सन १९९० पासून पोलीस आयुक्त यांचे कार्यालयास बनावट कराराद्वारे भाडेतत्वावर दिली असल्याचे तसेच सदरची जागा नाशिक डायोसेशन कौन्सिल (NDC) या संस्थेने बनावट कागदपत्राद्वारे परस्पर विक्री करुन सुमारे ३०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याची बाब दिनांक ११ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने नाशिक डायोसेशन कौन्सिल (एनडीसी) संस्थेने बेकायदेशिररित्या जागा भाडेतत्वावर देऊन तसेच विक्री केल्याप्रकरणी करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदरची मालमत्ता नाशिक डायोसेशन ट्रस्ट असोसिएशन प्रा.लि. (NDTA) या कंपनीच्या नावे असल्याचे माहित असून सुध्दा नाशिक डायोसेशन कौन्सिल (NDC) नामक संस्थेने सदरच्या जागेची मालकी नसताना नामसाधर्म्याचा फायदा घेवुन सदर मिळकतीचे मालक असल्याचे भासवुन सन १९९० पासून सदरची मिळकत पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना भाडेतत्वावर दिली व सदर भाड्यापोटी प्राप्त रकमेचा अपहार केला.

तसेच सदरच्या मिळकतीच्या विक्रीचा कोणताही अधिकार नसताना विक्री करण्यासाठी मा.धर्मादाय आयुक्तांची परवानगी प्राप्त करुन खरेदी करण्याऱ्या विकासकांशी संगनमत करुन दोघांच्या आर्थिक लाभाकरीता परस्पर विक्री करुन अंदाजे ३०० कोटी रुपयांची फसवणुक केल्याची बाब निदर्शनास आल्याने पोलीसांच्या फिर्यादीवरुन दिनांक ११ जून २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक ११ जून, २०२५ रोजी गुन्हा रजि.नं. १६६/२०२५ भा.न्या.स. कलम ३१६(२), ३१६(५), ३१८(४), ३३६(२), ३३७, ३३८, ३३६(३), ३४०(२), २३६, २३७, ६१(२), ३(५) याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यातील संबंधित सोळा आरोपींनी मा.न्यायालयात अटकपुर्व जामीन मिळण्याकामी अर्ज केला आहे, सदरील अटकपुर्व जामीन अर्जावरील निर्णय पुढील सुनावणी आदेशाच्या अधिन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात महाज्योतीच्या संशोधकांना नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती मिळण्याबाबत

**(१९) * २५२८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील इतर मागासवर्ग, भटके-विमुक्त व विशेष मागास प्रवर्ग (SBC) या गटांतील पी.एच.डी.संशोधकांना महाज्योती संस्थेमार्फत दिनांक २५ जुलै, २०२४ पासून केवळ ५ महिन्यांची अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर शासकीय संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्तीत संशोधकांना नोंदणी दिनांकापासून लाभ मिळतो मात्र महाज्योती संस्थेमार्फत वेगळा निकष लावून संशोधकांवर अन्याय केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाज्योती संस्थेच्या संशोधकांना नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती मिळावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) बार्टी, सारथी व महाज्योती या संस्थांच्या अधिछात्रवृत्ती धोरणांमध्ये एकसमानता राहण्याकरीता दिनांक ११/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाज्योती संस्थेच्या संशोधक विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के दराने अधिछात्रवृत्ती देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात उपलब्ध तरतुदीनुसार पीएचडी अधिछात्रवृत्ती योजना-२०२३ अंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांपैकी ७१६ विद्यार्थ्यांना दिनांक २५/०७/२०२४ ते दिनांक ३१/१२/२०२४ या सहामाही कालावधीची रुपये १६,००,५०,७३४/- इतकी अधिछात्रवृत्तीची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थ्यांना दिनांक २४/०७/२०२४ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम योजनेतंर्गत उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीनुसार अदा करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यासह राज्यातील इतर जिल्ह्यात जिल्हा व सत्र न्यायालयातील अभियोक्तांच्या नियुक्त्या व कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ३७८६ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात जिल्हा व सत्र न्यायालय,जिल्हा सरकारी अभियोक्ता व जिल्हा सरकारी वकील यांच्या नियुक्त्या व त्यांच्या कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फौजदारी संहिता, १९७३ अन्वये प्रकरण २ कलम २४ अन्वये ठाणे जिल्ह्यासाठी सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करण्यात आली होती परंतु केंद्र शासनाने नव्या कायदयातील तरतुदीनुसार सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती बंधनकारक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सरकारी वकिलांच्या नियुक्त्या करतांना वय ६० वर्षे तसेच सन २००८ च्या अधिसूनेत ६० वर्षाऐवजी ६२ वर्षे हा मजकूर दाखल असताना दिनांक १४/०६/२०१४ रोजीच्या विधी व न्याय विभागाच्या नोटिफिकशेन, राजपत्र व मराठीत अधिसूचना ०२/०२/२०१५ मध्ये ५८ असे नमुद असून त्यात २ वर्षे वाढीव देण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे ही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सरकारी अभियोक्तांच्या नेमणुका फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४ नुसार करण्यात आल्या असल्याने, नविन कायदयानुसार वकिलांच्या नियुक्त्या करण्यात आल्या नसल्याने सध्या कार्यरत असलेल्या वकिलांच्या कोणत्या तरतुदीन्वये नियुक्त्या झाल्या आहेत यासंदर्भात चौकशी करुन जुन्या कायदयाअंतर्गत संबंधित विधी व न्याय विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती रद्द करुन नवीन कायदयाअंतर्गत नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १९८४ मधील तरतुदींनुसार तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ या कायद्यानुसार सर्व नियुक्त्या झालेल्या आहेत.

आत्ता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ या नविन कायद्यामधील तरतूदीनुसार नविन नियुक्त्यांबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(१) हे खरे आहे की फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण २ कलम २४ अन्वये ठाणे जिल्ह्यासाठी सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची मुदतवाढ संपुष्टात आल्यावर तेथील कार्यभार तेथे कार्यरत असलेले सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांच्याकडे सोपविलेला आहे.

हे खरे आहे की, आता नव्याने लागू झालेल्या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ या नविन कायद्यामधील तरतूदीअन्वये सरकारी अभियोक्ता हे अभियोग संचालनालयाच्या अधिनस्त असणार आहेत. तथापि, नवीन कायद्याचे कलम ५३१ (२)(ब) मधील तरतूदीनुसार यापूर्वी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये निर्गमित / अधिसूचित /आदेशित केले गेलेले सर्व आदेश नवीन कायद्यांतर्गत निर्गमित झालेले

आहेत असे समजण्यात येईल. याअर्थी पूर्वीच्या कायद्यांतर्गत केलेली नियुक्ती /अतिरिक्त कार्यभार अधिसूचना / आदेशामधील नमूद नियुक्ती समाप्तीच्या दिनांकापर्यंत त्यातील नमूद अटी /शर्तींस अधिन राहून कायम राहतील.

(३) हे खरे नाही.

विधि व न्याय विभाग, शासन अधिसूचना दिनांक १४/०६/२०१७ अन्वये मा.उच्च न्यायालयातील सरकारी वकील; किंवा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता या पदांकरीता जाहिरातीच्या दिनांकास उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे; परंतु जाहिरात दिनांकास जे अर्जदार मा.उच्च न्यायालयात सरकारी वकील; किंवा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता या पदावर कार्यरत असतील त्यांना उच्च वयोमर्यादेची अट ५८ वर्षानंतर २ वर्षे शिथील करण्यात आली आहे.

तसेच, इतर सरकारी वकील किंवा अतिरिक्त किंवा सहायक सरकारी वकील, सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता किंवा सरकारी वकीलांचे मानसेवी सहायक या पदावरील नियुक्तीकरीता जाहिरातीच्या दिनांकास उमेदवारांचे वय ५५ वर्षापेक्षा जास्त असू नये अशी तरतूद असून जे अर्जदार मा.उच्च न्यायालयात सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता आणि जिल्हा व सत्र न्यायालयात सरकारी वकील किंवा सरकारी अभियोक्ता किंवा अतिरिक्त/सहायक सरकारी वकील किंवा अतिरिक्त/ सहायक सरकारी अभियोक्ता म्हणून कार्यरत असतील त्यांना उच्च वयोमर्यादेची अट ५५ वर्षानंतर ५ वर्ष शिथिल करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १९८४ मधील नियम ३० (२) मध्ये विधि अधिकारी (सरकारी वकील किंवा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता) हे वयाच्या ६० वर्षापर्यंत पदावर कार्यरत राहू शकतील अशी तरतूद होती. त्यामध्ये विधि व न्याय विभाग, शासन अधिसूचना दिनांक २३/०१/२००८ अन्वये विधि अधिकारी (सरकारी वकील किंवा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता) हे वयाच्या ६० वर्षाऐवजी ६२ वर्षापर्यंत पदावर कार्यरत राहू शकतात अशी सुधारणा करण्यात आली आहे. आणखी असे की, विधि अधिकारी हा शारीरिकदृष्ट्या तंदुरूस्त असेल व काम करण्यास सक्षम असेल आणि योग्य कारण वाटल्यास विधि अधिकाऱ्यास वयाच्या ६२ वर्षांनंतर मुदतवाढ देण्याबाबत शासन निर्णय घेऊ शकते, अशी देखील तरतूद आहे.

त्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे विधि अधिकारी पदावरील नियुक्तीसाठी उमेदवाराचे जाहिरातीच्या दिनांकास अनुक्रमे ५८ व ५५ वर्षे वयाची अट असून त्यामध्ये कार्यरत विधि अधिकाऱ्यांना अनुक्रमे २ व ५ वर्षे वयाची सूट आहे. तसेच, नियुक्त विधि अधिकारी वयाच्या ६२ वर्षांपर्यंत पदावर राहू शकतो. आणखी असे की, विधि अधिकाऱ्यास वयाच्या ६२ वर्षांनंतर मुदतवाढ देण्याबाबत नियमातील तरतूदीनुसार शासन निर्णय घेऊ शकते.

(४) विधि व न्याय विभागामार्फत नियुक्त केलेल्या विधि अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबतच्या सर्व अधिसूचना / आदेश हे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ या नविन कायद्यामधील कलम ५३१ (२)(ब) मधील तरतूदीनुसार निर्गमित / अधिसूचित /आदेशित केले गेलेले आहेत असे समजण्यात येईल. याअर्थी वरील सर्व नियुक्त्या अधिसूचना / आदेशामधील नमूद नियुक्ती समाप्तीच्या दिनांकापर्यंत त्यातील नमूद अटी /शर्तींस अधिन राहून कायम राहतील.

तसेच, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ या नविन कायद्यामधील तरतूदीनुसार नविन नियुक्त्यांबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ या नविन कायद्यामधील तरतूदीनुसार नविन नियुक्त्यांबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## रायगड किल्ल्यावरील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याबाबत

**(२१) * ३६०९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने बसविण्यात आलेले १५ सीसीटीव्ही कॅमेरे गत ५ वर्षांपासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी दिनांक १२ एप्रिल, २०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री किल्ल्यावर आले असता सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करून त्याची देखभाल व दुरूस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) हे खरे नाही.

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळाकडून छत्रपती शिवाजी महाराज समाधीस्थळी व जगदीश्वर मंदिराच्या स्थळी यांच्याकडून ५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे असून सद्य:स्थितीत ३ कॅमेरे कार्यान्वित आहेत. तसेच, रायगड किल्ल्यावर कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड यांचे कार्यालयाकडून माहे जून २०२३ मध्ये ५८ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून सर्व कॅमेरे सद्य:स्थितीत कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.

भारतीय पुरातत्व विभागाने सीसीटीव्ही कॅमेऱ्याची कंट्रोल रूम हत्तीखान्याच्या मुख्य दालनातून हत्तीखान्याला लागूनच असलेल्या स्टोअर रूम येथे स्थलांतर करण्याचे काम प्रगतीपथावर होते. यानंतर दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत ५८ पैकी एकूण ४० कॅमेरे कार्यरत करण्यात आले होते.
(३) सद्य:स्थितीत सदरहू सर्व सीसीटीव्हि कॅमेरे कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली येथील आश्रमशाळेतील दोन आदिवासी विद्यार्थीनींची शिक्षकांनी छेड काढल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(२२)** * **३६७२ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण गडचिरोली येथील आश्रमशाळेमध्ये इयत्ता सातवी व आठवीत शिकणाऱ्या दोन आदिवासी विद्यार्थीनींची दोन शिक्षकांनी दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी छेड काढल्याने शिक्षकांवर विनयभंग व बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा व ॲट्रॉसिटीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षिण गडचिरोली मधील आश्रमशाळेतील विद्यार्थीनींच्या अशा प्रकारच्या छेडछाडीच्या तीन घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनानेकोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) खरे आहे,

श्रीगुरुदेव आश्रम शाळा, कमलापुर, जि.गडचिरोली येथील शिक्षकांनी अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याप्रकरणी उप पोलीस स्टेशन, रेपनपल्ली येथे गु. र. क्र. ०१/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५(१)(१), ३५१ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२, सह अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(w)(i)(ii), ३(२)(va) अन्वये दिनांक ०८/०४/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र.१ यास मा.न्यायालयाने दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या आदेशान्वये अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. व आरोपी क्र.२ न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(२) व (३) खरे आहे,

दक्षिण गडचिरोली येथे उपरोक्त गुन्ह्याव्यतिरिक्त खालीलप्रमाणे दोन पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे.

अ) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुक्कामेटा शाळेतील मुख्याध्यापकाने अल्पवयीन मुलींचा विनयभंग करुन धमकी दिल्याप्रकरणी उपपोलीस स्टेशन, लाहेरी येथे गु. र. क्र. ०१/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५ (२), ३५१ (२)(३), सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ८, १०, १२, सह अनुसूचित जाती अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(w)(i)(ii), ३(२)(va) अन्वये दिनांक ०५/०३/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी न्यायालयीन कोठडीत असून त्याचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

आ) जिल्हा परिषद समुह निवासी शाळा, भामरागड शाळेतील मुख्याध्यापकाने अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याप्रकरणी पोलीस ठाणे, भामरागड येथे गु. र. क्र. १५/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५(२), ३५१(२), ३५१(३) सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ८, १०, १२ अन्वये दिनांक ११/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी न्यायालयीन कोठडीत असून त्याचे विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाकरीता शासनाच्या पूर्वमान्यतेविना इमारत भाड्याने घेतल्याबाबत

**(२३) * ४४४४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार दिनांक २८/०२/२०२३, १३/०३/२०२३ व १९/१२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार १०० क्षमतेची शासकीय वसतिगृहे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असतानाही, पुणे येथे याच निर्णयाच्या विरोधात २०० विद्यार्थी क्षमतेची इमारत शासनाच्या मान्यतेविना भाड्याने घेण्यात आल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहासाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात विद्यार्थ्यांची संख्या, आवश्यकतेचा आढावा व शासनाच्या मान्यतेसाठी आवश्यक असलेली इमारतीची पूर्णत्व प्रमाणपत्रे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे व आरोग्य प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्रे उपलब्ध नसून पुण्यातील संबंधित वसतिगृहासाठी शासनाच्या मान्यतेविना नव्याने श्री.भूमकर यांच्या मालकीची इमारत कोणत्याही वैध स्पष्टीकरणाविना निवडण्यात आली असून आवश्यक क्षेत्रफळाच्या दुप्पट क्षेत्रफळाची इमारत भाड्याने घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहात केवळ ५४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला असूनही २०० विद्यार्थी क्षमतेची इमारत भाड्याने घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने वित्तीय धोरणाचे उल्लंघन करणाऱ्या सदर प्रकरणातील जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्त भंगात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णयानुसार १०० विद्यार्थी क्षमतेची शासकीय वसतिगृहे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून पुणे येथील वसतिगृहाच्या इमारतीस कार्योत्तर शासन मान्यता देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) पुणे येथील इमारत मालक शासकीय दराने त्यांच्या इमारती वसतिगृहाकरीता भाडेपट्टीने उपलब्ध करुन देण्यास इच्छुक नव्हते. श्री.भुमकर यांनी त्यांची इमारत वसतिगृहाकरीता शासकीय मुल्यांकनाप्रमाणे भाडेपट्टीने देण्यास इच्छुकता दर्शविली. परंतु, सदर इमारतीचे क्षेत्रफळ हे शासनाने ढोबळ मानाने ठरविलेल्या क्षेत्रफळापेक्षा जास्त होते. पुणे शहरात इमारत मिळण्यास येणाऱ्या अडचणींचा विचार करता व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता क्षेत्रिय कार्यालयाने ताब्यात घेतलेल्या श्री.भुमकर यांच्या इमारतीस कार्योत्तर शासन मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांदवड (जि.नाशिक) येथील अहिल्यादेवी होळकर यांच्या ऐतिहासिक रंगमहालाचा पुनर्विकास करण्याबाबत

**(२४) * ४४७२ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदवड (जि.नाशिक) येथील अहिल्यादेवी होळकर यांचा ऐतिहासिक रंगमहाल मागील अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असून त्याच्या पुनर्विकासाचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सन२०१९मध्येजिल्हावारसास्थळसमितीनेयाठिकाणीपुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली काम हाती घेतले होते, परंतु निधीअभावी व प्रशासनाच्या उदासीनतेमुळे सदरचे काम पूर्णत्वास गेले नसल्यामुळे स्थानिक जनतेमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान आणि त्यांचे वास्तुकला संपन्न ठसे राष्ट्रीय वारसा स्थळ म्हणून महत्त्वाचे असल्याने रंगमहाल परिसराचा रेणूकादेवी मंदिरासह एकत्रित पर्यटन विकास आराखडा बनवून तातडीने पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या ऐतिहासिक वारसास्थळाच्या दुरवस्थेच्या कारणांची चौकशी केली आहे काय, तसेच सदर ठिकाणांवर पुनर्विकास, जतन व प्रचार-प्रसारासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) नाही.

सदर स्मारक संरक्षित आहे. या स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाकरीता या विभागाकडून वर्ष २००५-०६, २००७-०८, २०१२-१३, २०१३-१४ या आर्थिक वर्षात वेळोवेळी उपलब्ध झालेल्या निधीतून छताची कौले बसविणे, लाकडी रॅपटर बदलणे, परिसर साफ सफाई करणे, घोडा तबेला, धान्य कोठार, दक्षिणी उत्तर पुर्व पश्चिम पाथवे, कृष्ण मंदिराच्या पश्चिम व दक्षिणेकडील भिंत, सिमाभिंत, शाहबद फरशी, दगडी फरशी, तुळशीवृंदावन, नगारखाना, कृष्ण मंदिराजवळील बुरुज, पहिले व दुसऱ्या मजल्यावरील लाकडी दरवाजे व खिडक्या, नगारखाना पॅरापीट वॉल, दुसऱ्या मजल्यावरील लाकडी कमान, छत, खांब, लाकडी कामास पॉलीश करणे इत्यादी प्रकारचे जतन संवर्धनाची कामे करण्यात आली आहेत.

(२) नाही.

प्रादेशिक पर्यटन विकास योजना २०२१-२२ मध्ये या स्मारकाच्या जतन दुरुस्ती कामाकरीता रुपये ५.०० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यानुसार जतन दुरुस्ती काम सुरु असून प्रगतीपथावर आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ मध्ये रुपये ०.७६ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळली असून सदर काम सुरु आहे.

(३) अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान आणि त्यांचे वास्तुकलासंपन्न असे रेणूकादेवी मंदिर, चांदवड, ता.चांदवड या स्मारकाचे जतन दुरुस्ती कामाचे सविस्तर अंदाजपत्रक व स्थळ व्यवस्थापन आराखडा बनविण्याचे काम सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे परळ आगार अस्वच्छ असल्याबाबत

**(२५) * ४४१३ श्री.सुनिल शिंदे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या परळ आगाराच्या शौचालयात पाणी उपलब्ध नसल्याने शौचालय अस्वच्छ असणे, सर्वत्र साफसफाई नसणे शौचालयामध्ये सद्य:स्थितीत घाणीचे साम्राज्य पसरल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून, परळ आगार अस्वच्छ असल्याची गंभीर बाब दिनांक ५ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, आगारातून दररोज बसेसच्या २०० फेऱ्या चालविल्या जात असल्याने हजारो प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून परळ डेपोच्या प्रवेशद्वारावर बसविण्यात आलेले बॉडी स्कॅनर बंद असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व आगारांत शौचलयांच्या स्वच्छतेची खबरदारी घेण्याचे निर्देश मा.परिवहन मंत्री महोदयांनी दिले असतानाही परळ आगारातील अधिकाऱ्यांनी\ सदर निदेशाची अंमलबजावणी केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आणि मुंबईतील एसटी महामंडळाच्या परळ आगारातील स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) शौचालयातील पाईप लाईन फुटल्यामुळे काही कालावधीकरीता तात्पुरती असुविधा झाली होती.

(२) सदर मेटल डिटेक्टरचे आयुर्मान पूर्ण झाले असल्याने, ते निर्लेखित केले आहे. नवीन मेटल डिटेक्टर खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) मा.मंत्री (परिवहन) यांनी निर्देश दिलेले आहेत.

(४) व (५) रा.प. परळ बसस्थानकाच्या बेसिनचे नळ तुटल्यामुळे शौचालयाचे पाणी प्लबंर उपलब्ध होईपर्यंत बंद करण्यात आले होते. प्लबंर प्राप्त होताच नळाचे काम केल्यानंतर पाणी पुन्हा चालू करण्यात आले. तसेच रा. प. परळ आगारातील शौचालयाचे ड्रेनेज लाईन तुटल्यामुळे ड्रेनेज ओव्हर फ्लो होत असल्याने आगारातील शौचालयाचे ड्रेनेज साफ करणेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविण्यात आले असता, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून तात्काळ कार्यवाही करण्यात आली.

रा.प. मुंबई विभागातील सर्व बसस्थानकावर स्वच्छता ठेकेदारांची नेमणूक केली आहे व आगार स्तरावर बसस्थानक स्वच्छतेवर देखरेख ठेवून प्रभावीपणे स्वच्छता केली जाते.

-----------------

## राज्यात महावितरण कंपनीकडून ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती केल्याबाबत

**(२६) * ३८४८ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७ ला दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणाकडून ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविण्याकरीता सक्ती केली जात असून स्मार्ट मीटर बसविण्यास सर्व स्तरावरुन विरोध होत असूनही स्मार्ट मीटर बसविण्याचा निर्णय महावितरण कंपनीने घेतला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्व विजेची मीटर बदलून त्याऐवजी स्मार्ट मीटर बसविण्यात येणार असून सर्व विद्युत वितरण कंपन्यांना ही स्मार्ट मीटर बसविणे बंधकारक करण्यात आले असून या स्मार्ट मीटरमुळे, नेटवर्कची समस्या तसेच डेटा गोपनीयता आणि सुरक्षितेबाबत प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ग्राहकांचा विरोध असल्यास वीज ग्राहकांकडे स्मार्ट प्री-पेड वीज मीटर बसविले जाणार नसल्याची घोषणा तत्कालिन मा.ऊर्जा महोदयांनी माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्मार्ट मीटर बसविण्यासंदर्भात फेरविचार करुन वापरात असलेले मीटर सुरु ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

स्मार्ट मीटरचे विविध फायदे विचारात घेऊन केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने दिनांक २६/०२/२०२१ रोजी सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर लावण्याचे सुचित केले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक १७/०८/२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविण्याचे सुचित केले आहे.

(२) हे खरे नाही.

स्मार्ट मीटर वापरासाठी तयार करण्यात आलेली प्रणाली पूर्णपणे सुरक्षित असून सदर प्रणाली सायबर सुरक्षित आहे. या प्रणालीचे नियमितपणे सायबर सुरक्षा ऑडिट करण्यात येते.

(३) हे खरे आहे.

सदर घोषणा केल्याप्रमाणे सद्य:स्थितीत ग्राहकांना स्मार्ट मीटर प्रीपेड पध्दतीने न बसविता सध्याच्या प्रचलित पोस्ट पेड पध्दतीनेच बसविण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बनावट नोटा बनविण्याऱ्या छापखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२७) * ३७०० श्री.संजय खोडके, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे २८ लाख रुपयांच्या बनावट नोटा दिनांक १ मे, २०२५ रोजी जप्त करण्यात आल्याची तसेच भिवंडी (जि.ठाणे) येथील गुन्हे शाखेने बनावट नोटा बनविण्याऱ्या छापखान्यांवर कारवाई करुन सहा जणांना अटक केली असल्याची बाब दिनांक ०८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत बनावट नोटा बनविणाऱ्या किती कारखान्यांवर छापे टाकण्यात आले तसेच बनावट नोटा बनविणाऱ्या सक्रीय टोळयांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यक्षेत्रांतर्गत दिनांक १७/०४/२०२५ रोजी बनावट नोटांबाबत प्राप्त फिर्यादीवरुन शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे येथे भा.न्या.सं. कलम १७८, १७९, १८०, ६१(२), २३८, १८१, १८२, ३(५) नुसार अप. क्र. ५९/२०२५ नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये अद्यापपर्यंत रुपये २८.९१ लक्ष किमतीच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

ठाणे पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील भिवंडी गुन्हे शाखेने प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे बनावट नोटा बनवणाऱ्या छापखान्यावर दिनांक ०३/०५/२०२५ रोजी छापा टाकून आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रुपये ३०.०० लक्ष किंमतीच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. त्याअनुषंगाने, शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी येथे भा.न्या.सं. कलम १७८(१), १८०,१८१,३(५) अन्वये दिनांक ०४/०५/२०२५ रोजी अप.क्र. ५१६/२०२५ दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये अद्यापपर्यंत रुपये ४५.५० लक्ष किमतीच्या बनावट नोटा जप्त करुन सहा आरोपींना अटक केली आहे.

(२) शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे येथे दाखल गुन्ह्यामध्ये ७ आरोपी आणि शांतिनगर पोलीस स्टेशन, भिवंडी येथे दाखल गुन्ह्यामध्ये ६ आरोपी निष्पन्न झाले असून सदर दोन्ही गुन्ह्यातील आरोपी हे न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत.

सदर गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल तपासणीकरीता पाठविण्यात आला असून सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

राज्यात बनावट नोटा बनविणाऱ्या सक्रीय टोळ्यांवर कारवाई करण्यात येत असून त्याबाबतची आकडेवारी खालीलप्रमाणे –

| सन | दाखल गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|
| २०२० | ३४ | ७१ |
| २०२१ | ४८ | ९८ |
| २०२२ | ४६ | ९९ |
| २०२३ | ४० | ८२ |
| २०२४ | ६८ | १३८ |
| १५ जून, २०२५ अखेरपर्यंत | ३७ | ७८ |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.